0068607

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. २६, वर्ष Year 2023 दिनांक Date २९/०६/२०२३

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day बुधवार तारीख पासून Date from ५/६/२०२३ वेळ Time १४:३४, तारीख पर्यंत Date to २९/६/२०२३ वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १४/६/२०२३, वेळ Time ११:००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १०/२०२३ तारीख Date २९/६/२०२३ वेळ Time १०:३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा १० कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name आर. ए. के. मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name शाहानवाज मुल्ला (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बाबासाहेब मुल्ला
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ७७७४०९७८७४
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी पोलीस निरी
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर/नाव नं. House/Name No., फोन/मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, सरपोचखानवाला मार्ग,
   रस्त्याचे नाव Road वरळी, मुंबई-४०००३०. जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   मंगेश नाना मोपके, पद- पो.शि. क्र. ०९३३५, नेमणूक- आर.ए.के. मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

**चौकशीतील प्रथम दर्शनिय निष्कर्ष:**

एकंदरीत चौकशीच्या कार्यकक्षेमध्ये आवश्यक असलेल्या बाबी वरून खात्री केली असता गैरअर्जदार क्र.१ व ३ यांनी लाचेची मागणी केल्याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध झालेला नाही.

तक्रारदार फिरोज उस्मान टिनवाला व लोकसेवक गैरअर्जदार क्र.०२ मंगेश भोपळे यांच्यामधील दि.०३/०७/२०२३ व दि. ०४/०७/२०२३ रोजीचे फोन कॉल तसेच दि.०५/०७/२०२३ रोजीने व्हॉटसअप कॉल रेकॉडींग वरून व चौकशीतील इतर प्राप्त पुराव्यावरून लोकसेवक गैरअर्जदार क्र.२ मंगेश नाना भोपळे, पोलिस शिपाई क्र.०९.३३३५ नेमणूक आर.ए.के मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदार फिरोज उस्मान टिनवाला यांचे आदर्शनगर विकास सोसायटी, हिलाल मशिद समोर, आर.ए.के किडवाई मार्ग, वडाळा पश्चिम येथील अनाधिकृत रहात असलेल्या रहिवाशांना बाहेर काढणेकरीता एस.आर.ए च्या अधिकारी यांना आर.ए.के मार्ग पोलीस ठाणेकडून २० ते २५ दिवस उशिरा बंदोबस्त पुरविणेत येईल त्याकरीता वरिष्ठांना २० लाख रूपये देऊन वरिष्ठांचे कडून तुमचे काम करून घेतो. असे भासवून तक्रारदार फिरोज उस्मान टिनवाला यांचेकडे २० लाख रूपये लाचेची मागणी केल्याचे चौकशी मध्येदिसून येत असलेने गैरअर्जदार लोकसेवक क्र.२ मंगेश नाना भोपळे, पोलिस शिपाई क्र.०९.३३३५ नेमणूक आर.ए.के मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७(अ) प्रमाणे माझी फिर्याद आहे.

**खालीलप्रमाणे दस्तऐवज मुळ अहवाल व चौकशीच्या कागपत्रांसोबत दि.१७/०७/२०२३ रोजी सादर करण्यात आलेल्या आहेत.**

१) व्हाईस रेकॉर्डीग क्लिपस् असलेली सिलबंद सी.डी.
२) आर.ए.के.मार्ग, पो.ठाणेतील दि.०४/०७/२०२३ रोजीचे सीसीटीव्ही. फुटेज असलेला सिलबंद पेनड्राईव्ह
३) दि.०५/०७/२०२३ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यातील सिलबंद मेमरी कार्ड
४) अणुक्रम नं. १ ते ८३ अशी कागदपत्रे जोडली आहेत.

समक्ष

( संजय प्रधान ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

21/07/23
( शहानवाज मुल्ला ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | लोकसेवक क्र.२ यांनी त्यांचे वरिष्ठांचेकरीता लाच मागणी केल्याचे तक्रारदार सांगत आहेत. | ३) लोकसेवक क्र.२ यांचेशी व्हॉटसअप कॉलींगव्दारे बोलताना रेकॉर्डींग केलेल्या क्लिप यांची ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आली. ट्रान्सक्रिप्ट मध्ये खालील भाग नमुद आहे.<br>तक्रारदार – साहब क्या बोले...लास्ट क्या बोल रहे है...<br>लोकसेवक – **बीस हि बोले है...बीस से कुछ कम नही कुछ जादा नही...**<br>तक्रारदार – बीस पेटी...बीस लाख ना....<br>लोकसेवक – **हा...हा...हा...**<br>तक्रारदार – अभी मेरे को उसमे क्या फायदा होगा...मतलब कितने दिन का..<br>लोकसेवक – बीस दिन का बोला ना मैने पहेले...<br>तक्रारदार – डेमोलेशन....मतलब ये पुलीस प्रोटेक्शन जो अभी सात तारीख को मिल रहा है....वो कितने दिन तक के टाल देंगे वो लोग....<br>लोकसेवक – हा...बीस पच्चीस तारीख तक... बीस पच्चीस दिन तक टालेंगे अपुन..<br>सोबत सविस्तर ट्रान्सक्रिप्ट जोडली आहे. | संबधित रेकॉर्डींग मधील संभाषणाच्या ट्रान्सक्रिप्टचे अवलोकन केले असता लोकसेवक क्र.२ यांनी तक्रारदार यांचेकडे वरिष्ठ अधिकाऱ्याचे नावाने २० लाख रूपये लाच मागणी केल्याचे दिसून येत आहे. परंतु वरिष्ठ अधिका–यांचे नाव, पद समजून येत नाही. |
| ६ | अर्जदार स्वत: दि. ०४/०७/२०२३ रोजी आर.ए.के.मार्ग पोलीस ठाणे येथे जावून लोकसेवक क्र.२ यांना भेटले असल्याचे सांगत आहेत. | ५) अर्जदार व गैरअर्जदार हे दिनांक ०४/०७/२०२३ रोजी आर.ए.के.मार्ग पोलीस ठाणेत उपस्थित असल्याबाबतचे पोलीस ठाणेकडील सी.सी.टी.व्ही. फुटेज दोन शासकीय पंचासमक्ष पंचनामा करून ताब्यात घेण्यात आले. सोबत सी.सी.टी.व्ही फुटेज असलेला पेनड्राईव्ह जोडला आहे. | अर्जदार फिरोज टिनवाला, गैरअर्जदार क्र.१ ते ३ हे आर.ए.के मार्ग पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे केबीनमध्ये हजर असल्याचे व वपोनि यांचे कक्षाकडे जात असताना दि. ०४/०७/२०२३ १८:४५ ते १९:०५ वाजेपर्यतच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून येत आहे. |
| ७ | अर्जदार यांचेशी संबधित कामाबाबत | अर्जदार यांचेशी संबधित कामाकरीता एस.आर.ए च्या अधिकारी यांना बंदोबस्त पुरविणेबाबत मा सह आयुक्त सो, कायदा व सुव्यवस्था, मुंबई यांचे कार्यालयाकडून झालेल्या आदेशाची प्रत, तसेच सदरचा बंदोबस्त दिलेल्या तारखेला पुरविणेकरीता शासकिय नियमाप्रमाणे पैसे भरून घेतलेबाबत रिसिट ची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. | बंदोबस्त पुरविणेबाबतचा आदेश दि. २६/०६/२०२३ रोजी पो.उ.आ.अभियान, बंदोबस्त शाखा यांचे कार्यालयाकडून ०२ पोनि, ०२ पोउनि, ०२ मपोउनि, १० पोशि व १० मपोशि असा बंदोबस्त एस.आर.ए.च्या अधिकाऱ्यांना १०६ झोपडया रिक्त करण्याकरीता दि.०७/०७/२०२३ रोजी पुरविणेबाबत आदेश झालेला असून त्याकरीता शासकिय नियमाप्रमाणे ४८,३५९/– रू. दि.०४/०७/२०२३ रोजी सकाळी ११:१९ वाजता व रू.१८३१/– दि. ०७/०७/२०२३ रोजी १२:०४ वाजता भरून घेऊन दि.०७/०७/२०२३ रोजी निष्कासन कारवाई करीता बंदाबस्त पुरविला आहे. |

Scanned with OKEN Scanner

| | तक्रारीतील मुद्दे | केलेला तपास/चौकशी | प्राथमिक निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | तक्रारदार यांचे आदर्शनगर विकास सोसायटी येथे बेकायदेशीर राहणाऱ्या रहिवाश्यांना बाहेर काढण्यासाठी एस.आर.ए.च्या अधिकाऱ्यांना पुरविण्यात येणारा पोलीस बंदोबस्त वीस ते पंचवीस दिवस उशीरा पुरविण्याकरीता वपोनि महादेव निंबाळकर यांचेवतीने मिल स्पेशल मंगेश यांनी रू.२० लाख लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रार. | संबधित तक्रारीची ला.प्र.वि.पडताळणी क्र.४२/२०२३ अन्वये नोंद घेऊन तक्रारदार यांचे विनंतीप्रमाणे तक्रारदार यांचे मोबाईल वरून लोकसेवक क्र.२ यांना फोन करून पडताळणी केली. परंतु पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना फोन स्विकारला नाही. | लाच मागणीबाबत पडताळणी होऊ शकली नाही. |
| २ | तक्रारदार यांना लोकसेवक क्र.२ याने दिलेला स्वत:चा मोबाईल क्रमांक व त्यावर झालेले कॉल. | ४) तक्रारदार यांचे व गैरअर्जदार यांचे मोबाईल CDR, SDR, CAF Details व्हॉटसअप कॉल संदर्भात तक्रारदार यांचे मोबाईल मधील व्हॉटसअप कॉल लॉग दर्शविणारे स्क्रिनशॉट पंचासमक्ष प्राप्त करण्यात आले असून यासोबत जोडले आहेत. | CDR, SDR, CAF Details चे अवलोकन केले असता अर्जदार यांनी स्वता:चा मोबाईल क्र.९३२४४८९६६३ यावरून गैरअर्जदार क्र.२ मंगेश भोपळे यांचे मोबाईल क्रमांक ९०६७०२१४७४ यावर दि.०३/०७/२०२३ रोजी १३:१० वाजता व दि.०४/०७/२०२३ रोजी १५:१८ व १५:२० वाजता संभाषण केले आहे. तो मोबाईल क्रमांक गैरअर्जदार लोकसेवक क्र. २ यांचाच असल्याचे निष्पन्न होत आहे. |
| ३ | तक्रादार यांनी कार्यालयात येऊन लोकसेवक क्र.२ आता लाच स्विकारणार नाही. त्यामुळे लोकसेवक क्र.२ यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी माझेशी व्हॉटसअप कॉलव्दारे बोलत असताना लाचेची मागणी केली त्यावेळी मी लोकसेवक यांचा कॉल रेकॉर्डींग केला आहे. सदरच्या रेकॉर्डींग क्लिपस् मी आपणाकडे हजर करीत आहे. सदर क्लिपस्च्या आधारे लोकसेवक यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत मा.अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांच्या नावे दिनांक ०६/०७/२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला. सदरचा अर्ज अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांचे कार्यालयाकडील आ.क्र. १५१/२३,दि.०७/०७/२०२३ अन्वये दाखल. | १) अर्जदार व त्यांचे पत्नीचा सविस्तर जबाब नोंद करून त्यांचे पत्नी नामे अंबर पटेल यांचे मोबाईलमधील कॉलींग व रेकॉर्डींग बाबतचे स्क्रिनशॉट जबाबादरम्यान पंचांसमक्ष प्राप्त करण्यात आले असून यासोबत जोडले आहेत. | गैरअर्जदार लोकसेवक क्र.२ मंगेश भोपळे व अर्जदार फिरोज टिनवाला यांचेमध्ये दि. ०५/०७/२०२३ रोजी १४:३४ वाजता, १५:१० वाजता, १५:१२ वाजता व १५:२४ वाजता व्हॉटसअप कॉलींगव्दारे संभाषण झाल्याचे दिसून येत आहे. |
| ४ | अर्जदार यांचे लोकसेवक क्र.२ यांचेशी व्हॉटसअप कॉलव्दारे लाच मागणी संदर्भात झालेले संभाषण | २) गैरअर्जदार लोकसेवक क्र.२ मंगेश भोपळे यांचेशी व्हॉटसअप कॉलींगव्दारे बोलताना तक्रारदार फिरोज टिनवाला यांनी रेकॉर्डींग केलेल्या व्हाईस क्लिपस् नवीन सीडी मध्ये कॉपी करून घेऊन त्या पंचांसमक्ष ऐकण्यात आल्या व त्याची ट्रान्सक्रिप्ट तयार करून त्याबाबत दोन शासकीय पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला आहे. सोबत सीडी व ट्रान्सक्रिप्ट जोडली आहे. | संबंधित कॉल रेकॉर्डींग पंच व आम्ही ऐकले असता सदरच्या संभाषणात गैरअर्जदार लोकसेवक क्र.२ मंगेश भोपळे यांनी तक्रारदार फिरोज टिनवाला यांचेकडे २० लाख रूपये लाचेची मागणी केल्याचे दिसून येत आहे. |

Scanned with OKEN Scanner

जबाब

दिनांक :–२१/०७/२०२३.

मी शहानवाज बाबासाहेब मुल्ला, वय ४० वर्ष, धंदा– नोकरी (पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग) मो.नं. ७७७४०९७८७४.

मी वरील प्रमाणे असून सध्या लाप्रवि, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. आमचेकडे असलेली पडताळणी क्र.४२/२०२३, दि.०६/०७/२०२३ तसेच मा.अपोआ, लाप्रवि, मु. यांचे कार्यालयाकडील अर्ज आ.क्र. १५१/अपोआ/लाप्रवि/मु/२३, दि.०७/०७/२०२३ या चौकशीचा अहवाल दि.१७/०७/२०२३ रोजी सादर केलेला आहे. सदर अहवालावर मा.वरिष्ठांनी सपोआ, संजय प्रधान यांना गुन्हा दाखल करणेचे आदेश दिलेने सपोआ संजय प्रधान यांनी आज रोजी आम्हांस प्रत्यक्ष बोलवून फिर्याद देणेस सांगीतले. त्यावरून खालीलप्रमाणे फिर्याद देत आहे.

दिनांक ०५/०७/२०२३ रोजी मी लाप्रवि कार्यालय येथे कर्तव्यावर हजर असताना सपोआ प्रशासन यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार फिरोज उस्मान टिनवाला यांची ओळख करून दिली व तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संदर्भात तक्रार आहे. त्यांची तक्रार नोंदवून पुढील कारवाई संदर्भात मौखिक आदेश दिले. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार फिरोज उस्मान टिनवाला यांना त्यांचे स्वत:चे हस्ताक्षरात लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संदर्भातील तक्रार लेखी स्वरूपात लिहून देणेस सांगीतले. तक्रारदार यांनी लेखी तक्रार दिल्यानंतर सदर तक्रारीची पडताळणी करणेकरीता पथक तयार करून दोन शासकीय पंचांना बोलावून घेण्यात आले. सदर तक्रारी अर्जातील मजकुर पाहीला असता, सदरची लाच मागणी संदर्भातील तक्रार ही आर.ऐ.के.मार्ग पोलीस ठाणेतील लोकसेवकाविरूध्द असल्याचे खात्री झाल्याने संबंधित तक्रारीची पडताळणी क्र.४२/२०२३ अन्वये नोंद घेण्यात आली. त्यानंतर दोन शासकीय पंच लाप्रवि कार्यालयास हजर झालेनंतर त्यांना सदर तक्रारदार यांची ओळख करून देऊन त्यांचे तक्रारी संदर्भात तसेच करण्यात येणाऱ्या पडताळणी कारवाई संदर्भात माहिती देण्यात आली.

त्यानंतर तक्रारदार यांचे विनंतीप्रमाणे तक्रारदार यांचे मोबाईल वरून लोकसेवक यांना फोन करून पडताळणी केली. परंतु पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचा फोन स्विकारला नाही. त्यामुळे तक्रारदार यांना दुसऱ्या दिवशी दिनांक ०६/०७/२०२३ रोजी लाच मागणी संदर्भात पडताळणी कारवाई करीता कार्यालयात बोलाविले होते. त्याप्रमाणे दिनांक ०६/०७/०२३ रोजी तक्रादार यांनी कार्यालयात येऊन सांगीतले की, माझ्या कार्यालयात काम करणारा श्री.फैयाज हा आज सकाळी आर.ऐ.के.मार्ग पोलीस ठाणे येथे जाऊन आला. परंतु त्यांना सांगण्यात आले की, काल संध्याकाळी ०७ वाजेपर्यंत पैसे आणण्यास सांगीतले होते. आता ते पैसे स्विकारणार नाहीत. परंतु लोकसेवक यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी माझेशी व्हॉटसअप कॉलव्दारे बोलत असताना लाचेची मागणी केली होती. सदरचा कॉल मी रेकॉर्डींग केला असून त्याची रेकॉर्डेड क्लिपस् मी आपणाकडे हजर करीत आहे. सदर क्लिपस्च्या आधारे लोकसेवक यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत मा.अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांच्या नावे दिनांक ०६/०७/२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला आहे. सदरचा अर्ज अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांचे कार्यालयाकडील आ.क्र.१५१/२३, दि.०७/०७/२०२३ अन्वये दाखल करून पुढील चौकशी करीता आम्हांस प्राप्त झाला. तसेच दिनांक ०६/०७/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत तक्रारदार फिरोज उस्मान टिनवाला यांनी ई–मेलव्दारे ही लाप्रवि कार्यालयाच्या ई–मेल आयडीवर पाठविली असून ती चौकशीकरीता दि.१०/०७/२०२३ रोजी आम्हांस प्राप्त झाली आहे.

**अर्जदार व गैरअर्जदार यांचा तपशील :–**

**अर्जदार** :– अर्जाची पाहणी करता सदरचा अर्ज हा फिरोज उस्मान टिनवाला, वय ५८ वर्षे, व्यवसाय:–खाजगी बांधकाम विकासक, रा.ठि– वसंत विला, फ्लॅट नं.९, २रा मजला, ॲक्टीव्हीटी स्कूलच्या पाठीमागे, पेडर रोड, मुंबई ४०००२६यांनी खालील गैर अर्जदार यांचे विरूध्द दिलेला आहे.

**गैरअर्जदार** :– १) वपोनि, महादेव निंबाळकर, आर.ए.के.मार्ग, पोलीस ठाणे, मुंबई
२) मंगेश नाना भोपळे, पो.शि.०९.३३३५/मिल स्पेशल, आर.ए.के.मार्ग, पोलीस ठाणे मुंबई
३) महेश बडेकर, ऑर्डली, पो.शि.०९.२०३१/आर.ए.के.मार्ग, पोलीस ठाणे मुंबई

Scanned with OKEN Scanner

सदर गुन्ह्यातील मुळ अर्जदार इसम नामे फिरोज उस्मान टिनवाला, रा.ठि- पेडर रोड यांची मयुर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स नावाने बांधकाम व्यवसायाची फर्म आहे. सदर फर्मद्वारे आदर्श नगर विकास सोसायटी, आर.म.के. मार्ग वडाळा पश्चिम मुंबई येथील झोपडपट्टी विकासित करण्याचे काम चालु होते. नमुद ठिकाणी फर्मद्वारे केलेल्या बांधकामामध्ये राहत असलेल्या बेकायदेशीर रहिवाशी यांना बाहेर काढण्याकरीता तहसीलदार मस.आर.म. मुंबई यांनी आदेश पारीत केले होते. व त्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्याचे आदेश झाले होते. त्याअनुषंगाने अर्जदार टिनवाला हे आर.म.के. मार्ग पोलीस स्टेशन येथील व.पो.नि. निंबाळकर पो.शि. मंगेश पो.शि. ०९३३३५/भोपळे यांना भेटले व त्यांना अर्जदार टिनवाला यांनी सदर ठिकाणी सोसायटीच्या बांधकामाकरीता आलेली पाच ते सहा कुटुंब कामगार व कंत्राटदार राहत असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.शि. मंगेश भोपळे यांनी मोबाईलद्वारे अर्जदार टिनवाला यांना दि.५/७/२०२३ रोजी संपर्क साधून मस.आर.म.च्या अधिकारी यांना वीस ते पंचवीस दिवस उशीरा पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी रु.२०,००,०००/- लाचेची मागणी केली नमुद बाबत अर्जदार टिनवाला लाप्रवि मुंबई येथे दि.५/७/२०२३ रोजी लाच मागणी प्रकरणी कारवाई होणेसाठी तक्रार अर्ज दिला.

अर्जदार टिनवाला यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने लाप्रवि मुंबई येथील पो.नि. मुल्ला यांनी चौकशी केली व चौकशीअंती पो.शि. क्र. ०९३३३५/भोपळे यांनी अर्जदार टिनवाला यांच्याकडे मस.आर.म. अधिकारी यांना पोलीस बंदोबस्त उशीरा पुरविण्यासाठी रु. २०,००,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणून पो.नि. मुल्ला यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पो.शि.क्र. ०९३३३५/मंगेश नाना भोपळे, नेमणूक- आर.म.के. पोलीस स्टेशन मुंबई यांच्याविरुद्ध नमूद गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी यांची फिर्याद ही स्वतंत्र कागदावर टंकलिखित केली असून तिला प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature]

संजय प्रधान
सपोआ
लाप्रवि मुंबई

Scanned with OKEN Scanner